**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत...**

**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
**(महाराष्ट्र राज्य)**
**"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,मुंबई ४००००१**

**क्र.आसेआ/कक्ष-२अ/टे-६/वै.अ.गट-अ/क्रमांकः परिवि आदेश-२०२६/जा.क्र. 2003 /दिनांक १८ ऑक्टोबर, २०२६**

संदर्भ:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि.३० डिसेंबर,१९८७

२) शासन निर्णय, सामानय प्रशासन विभाग, क्रमांक परिवि-२७१४/प्र.क्र.३०२/आठ, दि.२९ फेब्रुवारी, २०१६

३) शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:परिवि-२७१८/प्र.क्र.२/आठ, दि.०७ फेब्रुवारी, २०१८

४) शासन निर्णय क्रमांक परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८ दिनांक २२ जून, २०२१

५) शासन पत्र क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६

## आदेश

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" या पदावर दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीकरीता खालील तक्त्यात नमूद वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गठित स्वतंत्र मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार "वैद्यकीय अधिकारी गट-अ" या पदावर शासन सेवेत प्रथम नियुक्तीने करण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भिय शासन निर्णयान्वये शासन सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या असून, वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या पदावर पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचा दोन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असल्याने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्य.८, दिनांक २२ जुन, २०२१ मधील अनुक्रमांक ६ मधील १ ते ३ बाबीची पुर्तता केलेली आहे.

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता सदर परिच्छेदात नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी समाधानकारकरित्या पूर्ण केलेल्या असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी या परिच्छेदातील तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास (म.नं.) समाप्त करण्यात येत आहे. तसेच त्यांची सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक (म. पू.) स्तंभ क्र.७ मध्ये नमूद करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | वै.अ. पदावरील रुजू झाल्याचा दिनांक | परिविक्षाधीन कालावधी समाप्त केल्याचा दिनांक | परिविक्षाधीन कालावधी पुढे ढकलल्याची कारणे | वै.अ. पदावरील सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | डॉ.सुरेखा भगवान हारकळ | ग्रामीण रुग्णालय, घनसावंगी जि. जालना | दि.१५.०३.२०२४ | दि.१४.०३.२०२६ | निरंक | दि.१५.०३.२०२६ |
| २ | डॉ. शेख रिजवान शेख रौशन | प्रा. आ. केंद्र, वरुड बु. ता. जाफ्राबाद जि. जालना | दि.०६.०३. २०२४ | दि.०५.०३.२०२६ | निरंक | दि.०६.०३.२०२६ |
| ३ | डॉ. अभिजित दत्तात्रय रेपाळ | प्राथमिक आरोग्य केंद्र, गादेगांव ता. पंढरपूर जि. सोलापूर | दि.१९.१२.२०१७ | दि.१८.१२.२०१९ | निरंक | दि.१९.१२.२०१९ |
| ४ | डॉ.बबिता विक्रमराव धोपटे | ग्रामीण रुग्णालय, भातकुली जि. अमरावती | दि.०३.०८.२०२१ | दि.१६.०८.२०२३ | १४ दिवस रजा | दि.१७.०८.२०२३ |
| ५ | डॉ. शुभांगी भिमराव हिवाळे | प्राथमिक आरोग्य केंद्र,वरखेडा ता. दिडोंरी जि.नाशिक | दि.२१.०९. २०२१ | दि.१०.१०.२०२३ | २० दिवस रजा | दि.११.१०.२०२३ |
| ६ | डॉ. रामेश्वर विष्णू कोठूळे | प्राथमिक आरोग्य केंद्र, धनज (बु) ता. कारंजा जि. वाशिम | दि.१६.०९. २०२१ | दि.१५.०९.२०२३ | निरंक | दि.१६.०९.२०२३ |
| ७ | डॉ. मनिषा बाबुराव चव्हाण | जिल्हा रुग्णालय, बुलढाणा | दि.१३.०७.२०२१ | दि.१९.०७.२०२३ | ७ दिवस रजा | दि.२०.०७.२०२३ |
| ८ | डॉ. गणेश साईनाथ ताडेवाड | प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहारा (बु) ता. औढा नागनाथ जि. हिंगोली | दि.१६.०९. २०२१ | दि.१५.०९.२०२३ | निरंक | दि.१६.०९.२०२३ |
| ९ | डॉ. स्वाती एकनाथ पाटील | उपजिल्हा रुग्णालय, मलकापुर जि. बुलढाणा | दि.०१.०१.२०१८ | दि.१२.०२.२०२० | ४२ दिवस रजा | दि.१३.०२.२०२० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | डॉ. प्रज्ञा दिनकर सुरडकर | प्राथमिक आरोग्य केंद्र, घाटनांदूर ता. आंबेजोगाई जि.बीड | दि.१६.०७. २०२१ | दि.०१.०८.२०२३ | १७ दिवस रजा | दि.०२.०८.२०२३ |
| ११ | डॉ. समाधान केशवराव ढाकणे | ग्रामीण रुग्णालय, लोणार जि. बुलढाणा | दि.०६.०३. २०२४ | दि.०५.०३.२०२६ | निरंक | दि.०६.०३.२०२६ |
| १२ | डॉ. रहेमान जवादूर रहेमान जाहिद | प्राथमिक आरोग्य केंद्र,हतनुर ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर | दि.०७.०३. २०२४ | दि.०६.०३.२०२६ | निरंक | दि.०७.०३.२०२६ |
| १३ | डॉ. अरशिया नौशीन एजाज हुसैन | नागरी दवाखाना डिग्रस क. ता.जि. हिंगोली | दि.२६.११. २०१५ | दि.१६.११.२०१८ | ३५६ दिवस रजा | दि.१७.११.२०१८ |
| १४ | डॉ. सचिन भिमराव अवसरमोल | प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपळवाडी ता. पैठण जि.छ. संभाजीनगर | दि.१३.०७. २०२१ | दि.१२.०७.२०२३ | निरंक | दि.१३.०७.२०२३ |
| १५ | डॉ. अभिजीत रविंद्र वाघमारे | ग्रामीण रुग्णालय, भिडी जि. वर्धा | दि.२९.११. २०१६ | दि.३०.१२.२०१८ | ३२ दिवस रजा | दि.३१.१२.२०१८ |

उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व), यांना कळविण्यात येते की, उक्त वैद्यकीय अधिकारी यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतुदीनुसार मुक्त करण्याच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करावी.

१. उक्त तक्त्यातील डॉ. अरशिया नौशीन एजाज हुसैन, वैद्यकीय अधिकारी यांना मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून दि.०३.०७.२०२२ पासून सूट मिळालेली आहे. तथापि, उपरोक्त तक्त्यात त्यांचा परिविक्षा कालावधी दि.१६.११.२०१८ रोजी समाप्त होवून स्तंभ ७ येथे नमूद केल्यानुसार त्यांची वैद्यकीय अधिकारी या पदावरील सेवा नियमितरित्या जरी दि.१७.११.२०१८ पासून पुढे चालू होत असली तरी, त्यांच्या वेतनवाढी दि.०३.०७.२०२२ पर्यंत रोखून त्या दिनांकापासून त्यांना वेतनवाढी देय होईल. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी संदर्भ क्र.१ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोखल्यांनतर तद्नंतर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाल्याच्या दिनांकापासून सदर अधिकाऱ्यास वेतनवाढी देय झाल्यांनतर त्यापुढील सर्व वेतनवाढी त्यांची कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखल्यामुळे त्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाही.

२. उक्त तक्त्यातील डॉ. अभिजीत रविंद्र वाघमारे , वैद्यकीय अधिकारी यांना मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून दि.१२.०१.२०२५ पासून सूट मिळालेली आहे. तथापि, उपरोक्त तक्त्यात त्यांचा परिविक्षा कालावधी दि.३०.१२.२०१८ रोजी समाप्त होवून स्तंभ ७ येथे नमूद केल्यानुसार त्यांची वैद्यकीय अधिकारी या पदावरील सेवा नियमितरित्या जरी दि.३१.१२.२०१८ पासून पुढे चालू होत असली तरी, त्यांच्या वेतनवाढी दि.१२.०१.२०२५ पर्यंत रोखून त्या दिनांकापासून त्यांना वेतनवाढी देय होईल. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी संदर्भ क्र.१ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोखल्यांनतर तद्नंतर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाल्याच्या दिनांकापासून सदर अधिकाऱ्यास वेतनवाढी देय झाल्यांनतर त्यापुढील सर्व वेतनवाढी त्यांची कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखल्यामुळे त्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाही.

उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व), यांनी वरील तक्त्यात नमूद वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या परिविक्षाधीन कालावधीत कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नसल्याबाबतची तसेच त्यांचेविरुध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण सुरु नसल्याबाबतची खातरजमा करुन त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची नोंद सेवापुस्तकात घेण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात.

शासन पत्र क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभातील कार्यरत वैद्यकीय अधिकारी, एस-२० संवर्गातील अधिकारी यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्ती करण्याबाबतचे अधिकार सामान्य प्रशासन विभाग दिनांक २२ जून, २०२१ मधील अटी व शर्ती विहीत परिविक्षा कालावधीत पूर्ण करणा-या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचे अधिकारी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना प्रत्यावर्तीत करण्यात आले आहेत. सदर प्रदान केलेल्या अधिकारानुसार आयुक्तालय स्तरावरुन आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

सदर आदेश आयुक्तालयाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत.

**(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)**

**(राजेंद्र भालेराव)**
**सहसंचालक, (प्रशासन)**
**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**

**प्रति,** १) संबंधीत वैद्यकीय अधिकारी (संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांचेमार्फत)

२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.

३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

४) महालेखापाल, लेखापरीक्षा- १, महाराष्ट्र, मुंबई.

५) महालेखापाल, लेखापरीक्षा- २, महाराष्ट्र, नागपूर.
६) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
७) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१०) निवडनस्ती (कार्यासन -२अ)